**सं.फौ.ख.क्र. १०५९/२०२३**
**शासन विरुध्द गणेश**
**निशाणी क्र. १२ खाली**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांचा पुढील उलटतपास शपथेवर सुरु.**
**आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. एस.डी. खामकर -**

३. कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये फलेक्स बोर्ड व पत्राशेडचे भाडे देत असल्याचे दर्शविण्याकरीता मी आज रोजी दस्त अभिलेखावर दाखल केले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, तेथील बाजारसमितीत एका गाळयात "कॉर्नर" नावाचे माझे हॉटेल आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या गाळयातील उर्वरीत भागात मी पोटभाडेकरु ठेवला आहे. हे म्हणणे खरे आहे की, बाजार समितीमध्ये माझे हॉटेल असल्याने तेथील अधिकारी व कर्मचारी यांचेशी माझे चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझा गाळा क्र.१६ च्या अगदी शेजारी बाजार समितीचे कार्यालय आहे. हे म्हणणे खरे आहे की, बाजार समितीच्या बांधकामाचे ७/१२ उतारे व नकाशे मी स्वतः पाहिलेले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे बाजारसमितीच्या एकूण क्षेत्रफळाविषयी मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे बाजारसमितीच्या कोणकोणत्या बाजुला संरक्षक भिंती बांधल्या आहेत त्याबाबत मला सांगता येणार नाही.

४. हे म्हणणे खरे आहे की, बाजार समितीचे मुख्य व्दार उत्तर दिशेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, बाजार समितीच्या एका बाजुला महाराष्ट्र विदयुत वितरण कंपनीचे कार्यालय देखील आहे. तथापि तेथे पूर्व बाजुला लोकवस्ती असल्याचे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, बाजार समितीच्या चारही दिशांना नेमके काय काय आहे याबाबत मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, गणेश सावंत नामक व्यक्ती माझी पूर्वपरिचित नाही तसेच आजअखेरपर्यंत माझा त्यांच्याशी संपर्क आलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, सचिन क्षिरसागर यांच्या सांगण्यावरुन मी कथीत घटनास्थळी गेलो होतो. मला त्यावेळी पोलीसांनी बोलाविले होते. परंतु ते दर्शविण्याकरीता माझ्याकडे पोलीसांचा कोणताही समन्स अथवा नोटीस नाही. पोलीसांनी मला कथीत घटनास्थळाची कागदपत्रे दाखविली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझ्याकडून माझे नाव, वय, व्यवसाय व पत्ता अशी जुजबी माहिती घेतली होती. पोलीसांनी ती माहिती कुठल्या कागदावर लिहून घेतल्याचे मला

आठवत नाही. तथापि, पोलीसांनी माझ्या सहया घेतल्याचे मला आठवते. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी पोलीसांनी माझ्या एकूण किती कागदांवर सहया घेतल्या होत्या हे मला सांगता येणार नाही. मी इयत्ता दहावी पर्यंत शिक्षित आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या कथीत कागदपत्रांपैकी काही कागद इंग्रजीत लिहिले होते तर काही कागद मराठीत लिहिले होते. हे म्हणणे खरे आहे की, मला इंग्रजी भाषा समजत नाही. हे म्हणणे खरे नाही की, ज्यापण माझ्या सहया घेण्यात आल्या होत्या त्या सर्व वाई पोलीस ठाणे येथील ठाणे अंमलदार यांच्या टेबलवर घेण्यात आल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, मी बाजार समितीचे सचिव यांच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगीतलेला संपूर्ण मजकूर खोटा आहे व माझ्या समक्ष कोणतीही पंचनामा कार्यवाही झाली नव्हती.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास काही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीक्रुत

RAVINDRA MADHUKARRAO BHENDE

Digitally signed by RAVINDRA MADHUKARRAO BHENDE
Date: 2025.09.24 16:40:28 +0530

दि. २४/०९/२०२५

(आर.एम. भेंडे)

२रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, वाई.